**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## आवड, जिद्द आणि सातत्य माणसाला महान बनवते - डॉ. जयकिरण तिडके
## रसायनशास्त्र विभागात निरोप समारंभ संपन्न

अमरावती.

जीवनात आवड, जिद्द आणि सातत्य माणसाला महान बनवते, असे प्रतिपादन माजी प्र-कुलगुरु तथा वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयकिरण तिडके यांनी केले. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात निरोप समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, माजी उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.एम.एन. नरवाडे, डॉ. मनिषा कोडापे, रसायनशास्त्र मंडळाचे अध्यक्ष कु. पायल टाले आदी उपस्थित होते.

डॉ. जयकिरण तिडके विद्यार्थ्यांना संबोधित करतांना म्हणाले, आपले आता विद्यार्थीजीवन संपून तुम्ही आयुष्याच्या एका नव्या दालनात प्रवेश करणार आहात. समाजात वावरतांना तुम्ही आतापर्यंत घेतलेल्या शिक्षणाची, ज्ञानाची व कौशल्याची कसोटी लागणार आहे. अनेक अडथळे, संकटे पार करुन जीवनात यशस्वी व्हायचे आहे. त्यासाठी जिद्द, चिकाटी, मेहनत व सातत्य हे गुण अवलंबावे लागतील. शिक्षकांचा आदर करुन स्वतःतील कौशल्ये व गुणवत्ता विकसित करा, तेच तुम्हाला सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असतील. आज्ञाधारकपणा, तत्परता व आपल्या कार्याविषयी प्रेम या तीन गोष्टी अंगीकृत करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी उपस्थितांना केले.

डॉ.एम.एन. नरवाडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी वेळेनुरुप स्वतःमध्ये बदल करायला हवेत. वाचन, लेखन व विश्लेषण यामध्ये रुची वाढवावी. वाचनामुळे आपल्याला समस्या ओळखता येतात व त्या सोडविताही येतात. जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर भविष्यात जेथे कुठेही कार्य करण्याची संधी प्राप्त होईल, तेथे प्रामाणिकपणे कार्य करा, असा मौलिक सल्ला त्यांनी दिला.

अध्यक्षीय विवेचनात डॉ. आनंद अस्वार म्हणाले, ज्ञानासह विश्लेषण महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी संवाद आणि व्यक्तिमत्व विकासाला महत्व द्यावे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. याशिवाय पुस्तकी ज्ञानाबाहेर जावून व्यवहारातील ज्ञान मिळवणे सुद्धा आवश्यक आहे. विभागातील विद्यार्थी हा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असल्याचे व विभागाचे नाव उज्वल करीत असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रभारी डॉ. मनिषा कोडापे यांनी कार्यक्रमामागील भूमिका विशद करुन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. पाहुण्यांचे स्वागत रसायनशास्त्र मंडळाचे अध्यक्ष कु. पायल टाले, सचिन रेवाडे, कु. रुपाली जाधव व कु. स्मिता नंद यांनी केले. संचालन कु. अंबिका पाठक हिने, तर आभार कु. पुनम टाकंडे हिने मानले. यावेळी विद्यार्थ्यांना विविध सहभागासाठी प्रमाणपत्रे व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. पायल टाले, कु. अमृता मकेश्वर, कु. योगिता पुरी, कु. रुपाली जाधव, कु. कल्याणी ठाकरे, सागर रेवाडे, कु. अश्विनी पवार, कु. पायल कडू, कु. स्मिता नंद तसेच विभागातील शिक्षक, कर्मचारी, आदींनी परिश्रम घेतलेत.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. ०८/०५/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी